# महाराष्ट्र विधानपरिषद
# पत्रक भाग दोन

## गुरुवार, दिनांक १ डिसेंबर, २०२२/अग्रहायण १०, (शके) १९४४

**१३७.** सर्व मा.सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२२ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनाकरिता सर्वसाधारण व प्रश्नातून उद्‌भवणाऱ्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना सोमवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२२ रोजीपासून कार्यालयीन वेळेत QIS या संगणक प्रणालीवर ऑनलाईन (Online) पध्दतीने स्वीकारण्यात येतील. स्वीकृत अर्धा-तास चर्चेच्या सूचनांचे बॅलटकरिता खाली दर्शविल्याप्रमाणे दिवस निश्चित करण्यात आले आहेत. सदर बॅलट विधान भवन, नागपूर येथील कार्यालयात श्रीमती पूनम ढगे, अवर सचिव आणि श्री. मोहन काकड, अवर सचिव यांचे दालनात घेण्यात येईल. उक्त बॅलटचा तपशील खालील विवरणपत्रात दर्शविण्यात आला असून त्यामध्ये बॅलटचा दिनांक विवरणपत्राच्या स्तंभ (१) मध्ये, अर्धा-तास चर्चेचा दिनांक विवरणपत्राच्या स्तंभ (२) मध्ये, बॅलटची वेळ विवरणपत्राच्या स्तंभ (३) मध्ये व बॅलट घेणाऱ्या अधिकाऱ्यांचे नाव विवरणपत्राच्या स्तंभ (४) मध्ये दर्शविण्यात आले आहे.

**<u>अर्धा-तास चर्चेच्या स्वीकृत सूचनांचे बॅलट</u>**

| बॅलटचा दिनांक (१) | अर्धा-तास चर्चेचा दिनांक (२) | वेळ (३) | अधिकाऱ्यांचे नाव (४) |
|---|---|---|---|
| सोमवार, दि.१९ डिसेंबर, २०२२ | मंगळवार, दि.२० डिसेंबर, २०२२ | सकाळी १०.३० वाजता | **श्रीमती पूनम ढगे** अवर सचिव |
| मंगळवार, दि.२० डिसेंबर, २०२२ | बुधवार, दि. २१ डिसेंबर, २०२२ | सकाळी १०.३० वाजता | **श्री.मोहन काकड** अवर सचिव |
| बुधवार, दि. २१ डिसेंबर, २०२२ | गुरुवार, दि.२२ डिसेंबर, २०२२ | सकाळी १०.३० वाजता | **श्रीमती पूनम ढगे** अवर सचिव |
| शुक्रवार, दि. २३ डिसेंबर, २०२२ | सोमवार, दि. २६ डिसेंबर, २०२२ | सकाळी १०.३० वाजता | **श्री.मोहन काकड** अवर सचिव |
| सोमवार, दि. २६ डिसेंबर, २०२२ | मंगळवार, दि. २७ डिसेंबर, २०२२ | सकाळी १०.३० वाजता | **श्रीमती पूनम ढगे** अवर सचिव |
| मंगळवार, दि. २७ डिसेंबर, २०२२ | बुधवार, दि. २८ डिसेंबर, २०२२ | सकाळी १०.३० वाजता | **श्री.मोहन काकड** अवर सचिव |
| बुधवार, दि. २८ डिसेंबर, २०२२ | गुरुवार, दि. २९ डिसेंबर, २०२२ | सकाळी १०.३० वाजता | **श्रीमती पूनम ढगे** अवर सचिव |

..२/-

सर्वसाधारण व प्रश्नातून उद्‌भवणाऱ्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना **QIS** या संगणकीय प्रणालीवर ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येतील, कृपया नोंद घ्यावी.

**विधान भवन,**
**मुंबई.**
**दिनांक : १ डिसेंबर, २०२२**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

**याची प्रत :-**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व मा. सदस्य
२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.
३) महाराष्ट्र विधानमंडळातील सर्व पक्ष कार्यालये.
४) संगणक कक्ष (website)
५) MKCL कक्ष.